MHKO050025702013

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३८४/२०१३**
**मधील नि.५१ वरील आदेश**
**मिनाक्षी कल्लाप्पा जाधव वि. रत्नाबाई**
**विष्णु भुयेकर**

सदरचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी, अबेटमेंट सेट असाईडसाठी व त्यांचे वारस अभिलेखावर असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे नाव वगळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ रत्नाबाई विष्णु भुयेकर या दि. ०७/०६/२०२१ रोजी रांगोळी तालुका हातकणंगले येथे मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र. २ व ३ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कोरोना प्रादुर्भावाच्या काळामध्ये त्यांना वेळेत पूर्तता करता आली नाही. या कारणावरुन त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादीने अर्जापाठीमागे म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने वेळेत पूर्तता केलेली नाही. त्यामुळे न्यायालयाचा वेळ विनाकारण जात आहे. अर्जातील कारण योग्य वाटत नाही. सबब अर्ज नामंजूर करावा, अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास वादीने प्रतिवादींना खर्च रुपये ५००/- दयावा अशी त्यांनी पर्यायी विनंती केली.

४. वादी तर्फे विद्वान वकिल पी.बी.सुतार, प्रतिवादी तर्फे विद्वान वकिल

बी.ए.देसाई यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटप व कब्जासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी ११ कडे कैफियत दाखल केली आहे. निशाणी १२ कडे मुद्दे काढण्यात आले आहेत. वादी व वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास पूर्ण करण्यात आला आहे. प्रकरण वादीच्या पुढील पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. ३ चे वारस निशाणी २९ कडील आदेशाप्रमाणे अभिलेखावरील आणलेले आहेत. प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याने पूर्तता करण्यासाठी वादीने निशाणी ४७ कडे दि. १२/११/२०२१ रोजी दिलेला अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याबाबत प्रतिवादीने न्यायालयाला कळविलेले नाही. कोरोना प्रादुर्भावाच्या काळात मृत्यूचा दाखला मिळविणे आणि पक्षकाराला बोलावून पूर्तता करणे अडचणीचे होते, हे कारण संयुक्तीक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे-

## आदेश

१. निशाणी ५१ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब व अबेटमेंट चा आदेश रद्द करण्यात येतो.

३. मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या नावापुढे मयत लिहून त्यांचे नाव वगळण्यास वादीला परवानगी देण्यात येते.

४. वादीने तात्काळ दावा दुरुस्ती करुन पुढील तारखेस दावा दुरुस्तीची प्रत न्यायालयाकरीता व प्रतिवादींकरीता दयावी.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Ganesh Arun Karajgar
Date: 2022.02.01 14:49:59 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक - ०१/०२/२०२२**

**(जी. ए. करजगार)**
**६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी.**